नि.दि.दावा क्र. ०५/२०१८

जगदिशप्रसाद वि. संजेप व इतर

## निशाणी क्र. ७४ खालील आदेशः–

प्रस्तुतचा अर्ज प्रतिदाव्यातील वादी यांनी आदेश १ नियम १० दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये प्रतिवादी क्रं २ म्हणुन पुरुषोत्तम संजय कदम यांना समील करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे.

प्रतिदाव्यातील वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे कथन केले की, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी जगदीशप्रसाद बांगड यांनी मे. न्यायालयाची परवानगी न घेतला वादग्रस्त मिळकत दिनांक १५/०२/२०२४ रोजी खरेदीखत दस्त क्रमांक ३२२/२०२४ नुसार पुरषोत्तम संजय कदम यांना हस्तांतरीत केलेली आहे. त्यामुळे प्रतिवादी दाव्यातील शिर्षकामध्ये प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्रं २ म्हणुन पुरषोत्तम संजय कदल यांचे नाव सामील करण्याकामी परवानगी मिळणेबाबत प्रतिदाव्यातील वादीने विनंती केली आहे.

३. या कामी प्रतिदाव्यातील प्रतिवादी यांनी अर्जावर त्याचे म्हणणे दाखल करुन मे.कोर्ट मर्जिनुसार योग्य तो हुकूम होणेस विनंती केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या कथनांचा विचार करता खालील मुद्दे या अर्जाच्या निकालासाठी उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे देण्यात आले.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | प्रतिदाव्यातील वादीने अर्जात नमूद केल्याप्रमाणे ते प्रतिवादी क्रं.२ सामील करुन घेवू शकतात काय ? | ... | होय. |
| २. | आदेश काय ? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा नं. १ चे संदर्भात -**

५. प्रतिदाव्यातील वादी व प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील वादीचा अर्ज, प्रतिवादींचे म्हणणे, कागदपत्रे व एकंदर परिस्थिती विचारात घेता असे निदर्शनास येते की प्रतिदाव्यातील प्रतिवादी ने वाद मिळकत ही खरेदीखत क्रमांक ३२२/२०२४ ही दिनांक १५/०२/२०२४ ही पुरुषोत्तम संजय कदम यांना प्रस्तुत प्रतिदावा प्रलंबीत असताना विक्री केली आहे. त्यामुळे प्रस्तुत

प्रतिदाव्याच्या गुणदोषावर व नैसर्गीक न्यायानुसार निकाल होण्यास अनुषंगून सदरचा अर्ज मंजूर करणे क्रमप्राप्त होईल. म्हणून वरील सर्व गोष्टींचा विचार करता मी या तथ्य विषयक आणि विधिविषयक निर्णयाप्रत आलेलो आहे की, न्यायाच्या दृष्टीने सदरचा अर्ज मंजूर करणे आवश्यक आहे म्हणून मी मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी लिहून मुद्दा क्र.२ करिता पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

**१.** अर्ज नि.क्रं.७४ मंजूर करणेत येत आहे.

**२.** प्रतिदाव्यातील वादीने अर्जात नमुद केलेप्रमाणे प्रतिवादी क्रं.२ पुरुषोत्तम संजय कदम यांचे प्रतिदाव्यात सामील करण्याचा आदेश पारीत करण्यात येतो.

**३.** प्रतिदाव्यातील वादीने अर्जाला अनुषंगून असणारी दुरुस्ती १४ दिवसात करावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर)

**(के.के.वाघमारे)**

**दिनांकः– १९/०४/२०२४** **सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर., रेणापूर**